# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

**परिपत्रक क्र. / ७**

शैक्षणिक वर्ष सन २०१५–२०१६ मध्ये प्रवेश घेतलेल्या व त्यापुढील बहि:स्थ प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांसाठी फी परताव्याबाबत खालीलप्रमाणे निकष आहेत :

- फी परताव्याची सवलत फक्त जे विद्यार्थी नव्याने बहि:स्थ प्रवेश घेतात त्यांच्यासाठीच असेल. बहि:स्थ पुन:र्परिक्षार्थी विद्यार्थ्यांसाठी ही सवलत असणार नाही.
- फी परतावा फक्त मॅनेजमेंट शुल्काचा होईल.
- जे विद्यार्थी प्रवेश अर्ज भरल्यानंतर १ महिन्याच्या आत फी परताव्यासाठी अर्ज करतील त्यांना मॅनेजमेंट शुल्कातून २० टक्के रक्कम वजा करुन उर्वरीत रक्कम परत करण्यात येईल.
- जे विद्यार्थी प्रवेश अर्ज भरल्यानंतर १ महिन्यानंतर पुढील ४५ दिवसांपर्यंत फी परताव्यासाठी अर्ज करतील त्यांना मॅनेजमेंट शुल्कातून ५० टक्के रक्कम वजा करुन उर्वरीत रक्कम परत करण्यात येईल.
- ज्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक पात्रता पूर्ण करत नसल्याबद्दल प्रवेश नाकारला जाईल त्यांना मॅनेजमेंट शुल्कातून २० टक्के रक्कम वजा करुन उर्वरीत रक्कम परत करण्यात येईल. अशा विद्यार्थ्यांना प्रवेश नाकारलेल्या दिवसापासून पुढील ६० दिवसांपर्यंत फी परताव्यासाठी अर्ज करता येईल.
- फी परताव्यासाठी अर्ज करताना विद्यार्थ्याने फी भरलेल्या चलनाच्या दोन्हीं मूळ प्रती (विद्यार्थ्याची व विद्यापीठाची प्रत) परताव्याच्या अर्जासोबत सादर करणे आवश्यक राहील.

उपकुलसचिव
बहि:स्थ विभाग

गणेशखिंड, पुणे –४११ ००७.
जा.क्र. : बहि:स्थ / ३४४
दिनांक : १३/०१/२०१६